# प्रकरण पाचवे

# 'सैतानाच्या खांबावर आशय आणि अभिव्यक्ती'

- **प्रस्तावना**

१) मनातले वादळी विचार व्यक्त करणारी कविता.

२) प्रेमाचा आशय व्यक्त करणारी कविता.

३) आत्मकथन करणारी कविता.

४) सामाजिक विषमता स्पष्ट करणारी कविता.

५) स्त्रियांच्याबद्दल आदर व्यक्त करणारी कविता.

६) जाती व्यवस्थेवर भाष्य करणारी कविता.

७) व्यक्तीचित्रणात्मक कविता.

८) डॉ. बाबासाहेबांच्याविषयी आदर व्यक्त करणारी कविता.

९) इतर आशयसूत्र मांडणारी कविता.

१०) शिर्षकाशय सांगणारी कविता.

- निष्कर्ष
- समारोप
- संदर्भ सूची

-----

## प्रकरण पाचवे

## 'सैतानाच्या खांबावर'आशय आणि अभिव्यक्ती

धम्मपाल रत्नाकर यांच्या 'हॉटेल माझा देश' व 'लक्तरांची गझल' या दोन कविता संग्रहांचा अभ्यास केल्यानंतर त्यांच्या तिसऱ्या कविता संग्रहामागे त्यांची काय भूमिका आहे याचा अभ्यास या प्रकरणात करावयाचा आहे. 'सैतानाच्या खांबावर' हा त्यांचा तिसरा कविता संग्रह 'समृद्धी प्रकाशन', कोल्हापूर यांनी डिसेंबर, २००३ ला प्रकाशित केला आहे. कवी रत्नाकरांनी हा कवितासंग्रह सावित्रीबाई फुले व रमाबाई आंबेडकर यांना अर्पण केलेला आहे. ही अर्पण पत्रिका आपल्या गत इतिहासाला उजाळा देते. सावित्रीबाई ही क्रांतीमाता नसती तर आम्ही लिहूच शकलो नसतो व रमाबाईनी कष्ट सोसले नसते तर ? ....... म्हणून ही अर्पण पत्रिका सूचक आहे.

डॉ. बाबासाहेबाच्या विचारांच्या आधाराने १९६० नंतर दलित साहित्याची निर्मिती झाली. फुले-आंबेडकरी विचारधारेचे हे साहित्य विज्ञान निष्ठ असल्याने, ते सामाजिक बांधिलकी स्वीकारून आल्याने, तळागाळातील समाजाचे प्रश्न मांडू लागले. दलित पिडीतांच्या व्यथा-वेदना यातून चित्रित होऊ लागल्या. विषमतेचा धिक्कार करून समतेचा, सुधारणावादाचा पुरस्कार करीत याच दशकात आंबेडकरी प्रेरणेची दलित कविता ही कार्यप्रवण झाली. मी ऐवजी आम्हीचे प्रतिनिधित्व करू लागली. ''उदात्त जीवन मूल्ये आपल्या साहित्यातून आविष्कृत करा'' या बाबासाहेबाच्या विचारांचा वसा घेऊन दलित कवितेने या देशातील उपेक्षितांच्या, दु:खीत, पिडीतांच्या दु:खाला वाचा फोडलेली आहे. हे दु:ख दारिद्रय आविष्कृत करतानाच प्रबोधन हे प्रथम महत्त्वाचे मानले. म्हणूनच ही कविता प्रस्थापित मराठी कवितेसारखी पाना-फुलांत, वाऱ्यांच्या संगतीत न रमता शोषित पिडीतांच्या दु:खाला ती भिडते. अनेक शतकांच्या या शतकी अन्याय, अत्याचारांवर ती हल्ला करते. खलनायकी प्रवृत्तीवर तुटून पडते. ही कविता जेवढ्या त्वेषाने वाईट रूढीच्यावर हल्ला करते तेवढ्याच कठोरपणे आत्मपरिक्षणही करते. जगाला समानतेचे सूत्र सांगणाऱ्या तथागत बुद्ध, म. फुले, डॉ. आंबेडकर या आपल्या ऊर्जास्त्रोतांना ती अभिवादन करते.

अनेक शतके सामाजिक हलाहल पचवलेल्या या माणसांची वाचा या मनुप्रणित समाजव्यवस्थेने बंद केली होती. पुढे ती बाबासाहेबाच्या क्रांतीकारी विचारांचे प्राषण करून भीमवाणी बोलू लागली. खराटा-मडक्याचीजागा पेन्सील पाटीने घेतली आणि आपल्या जीवनानुभवांना साकारू लागली. ही विचारक्रांती करणाऱ्या महापुरुषांना

प्रेरणास्त्रोत मानून ज्यांनी हजारो वर्षांचा अंधार दूर केला त्या प्रज्ञा सूर्याच्या तेजाने प्रकाशमान झालेली माणसे लिहू लागली, बोलू लागली. यातूनच या अन्यायकारी, अत्याचारी, शोषणयुक्त व्यवस्थेला उलटून द्यायचे सामर्थ्य त्यांच्यातनिर्माण झाले, या काळात निर्माण झालेल्या साहित्याला नवे धुमारे फुटू लागले. जीवननिष्ठेला पारखी झालेली मराठी साहित्यातील मरगळ दूर करण्यासाठी नवे संदर्भ शोधत, नव्या जाणिवा रुजवत फुले आंबेडकरी प्रेरणेच्या दलित कवितेची निर्मिती होऊ लागली. कवी नामदेव ढसाळांच्याच कवितेचा बाज राखत, पण नव्या जाणिवा, परिवर्तनाचे मूल्य जोपासत अखंड मानवतेशी आपले नाते सांगत बुद्धीप्रामाण्यवादाचा पुरस्कार करणारी, स्वत:चे कठोर आत्मपरिक्षण करणारी कविता 'सैतानाच्या खांबावर' या धम्मपाल रत्नाकरांच्या कवितासंग्रहातून येते. म्हणून याच दृष्टीने या कवितेचा विचार करावयाचा आहे. अभ्यासाच्या सोयीसाठी या संग्रहातील कवितांचे खालीलप्रमाणे वर्गीकरण केलेले आहे.

१) मनातले वादळी विचार व्यक्त करणारी कविता.

२) प्रेमकविता.

३) आत्मकथन करणारी कविता.

४) सामाजिक विषमता स्पष्ट करणारी कविता.

५) स्त्रियांच्याबद्दल आदर व्यक्त करणारी कविता.

६) जाती व्यवस्थेवर भाष्य करणारी कविता.

७) व्यक्तीचित्रणात्मक कविता.

८) डॉ. बाबासाहेबाच्या विषयी आदर व्यक्त करणारी कविता.

९) इतर आयश, विषय मांडणारी कविता.

१०) शीर्षकाशय सांगणारी कविता.

## १) मनातले वादळी विचार व्यक्त करणारी कविता :

दलित कविता ही स्वातंत्र्याच्या वैफल्यातून निर्माण झाली असली तरी ती फक्त अन्याय, अत्याचाराबद्दल बोलत नाही. तर ती प्रकाश युगात प्रवेश करून नवे माणुसकीचे मूल्य प्रस्थापित करते. माणसाच्या उन्नतीला प्राधान्य देऊन, माणसाच्या प्रगतीला अडथळे निर्माण करणाऱ्या, धर्म, संस्कृती, परंपरा यावर ती प्रखर हल्ला करते.

म्हणूनच दलित कवी मूल्य संकल्पना जपत जपत इथल्या विषमतेवर आघात करतात. त्यासाठी समाजवास्तव, मनातील राग, द्वेष प्रखरपणे व्यक्त करतात.

'रेखाटली नाही कधीच
वर्तुळाकार आकृती माझीच
वर्तुळातून मी कधीच बाहेर पडलोय
माणूसपणाचा शोघ घेऊ लागलोय.''[१] – (शोध)

कवी म्हणतो, या इथल्या मातीवर माझ्याच पायाचे सनातन ठसे उमटलेले आहेत. म्हणूनच मी हजारो वर्षे ज्यांनी चंद्र, चांदण्या पाहिल्याच नाहीत, अंधकारमय दु:खात जे खितपत, चाचपडत होते अशा माणसांच्या दु:खाला वाचा फोडतो आहे. मी लिहितोय त्यांच्या दु:खांच्या, त्यांच्या रक्तरंजीत इतिहासाच्या काहण्या आणि या सर्वांचे साक्षी आहे ते हे पिंपळ झाड, ज्या खाली बुद्धाला बुद्धत्व प्राप्त झाले. ''साठोत्तरी कवितेत विद्रोहाची प्रवृत्ती अधिक होती. त्यात ऐंशीच्या दशकानंतर प्रवर्तक जाणीवांची भर पडत गेली. आणि ही कविता अधिक प्रगल्भ झाली.''[२] अरविंद सुरवाड्याचे वरील मत योग्य आहे. कारण ऐंशीनंतरच्या दशकातील कविता ही आक्रस्ताळेपणा पेक्षा कठोर आत्मपरिक्षण व मूल्यात्मकतेकडे प्रकर्षाने केंद्रित होते. कवी रत्नाकरांची कविताही याच वळणाची आहे. कवी रत्नाकरांनी निसंकोचपणे आपल्या मनात निर्माण होणारे प्रश्न, त्यांच्या सोडवणूकीसाठी करावे लागणारेउपाय व यासाठी तटस्थ वास्तव निरिक्षण यांचे विश्लेषण केलेले आहे.

कवी रत्नाकरांचे बालपण हे यळगुडसारख्या खेड्यात गेले. पुढे शिक्षण आणि नोकरी शहरात ! त्यामुळे नागर संस्कृतीचे ग्राम संस्कृतीवर झालेले आक्रमण कवीला अस्वस्थ करते. या आक्रमणामुळे गावाचा चेहराच हरवून गेल्याने व त्यामुळेच 'मन धजत नाही रहायला या गावात' अशी कडवट प्रतिक्रिया कवी व्यक्त करतो. ज्याला आपण विकास समजतो, तो खऱ्या अर्थाने विकास नसून ती एक प्रकारची सूज असते. लोक या सूजेलाच विकास समजतात हेच दु:ख कवीने व्यक्त केलेले आहे.

''हा माझा समाज
पुन्हा देव धर्माच्या नादी लागलाय
त्यांनी तक्याचं देऊळबनवलय
गावातील पडकी देवळंही

नटलीयत जिर्णोद्धारानं

शाळा मात्र तशीच जुन्या कौलारू घरात

किती बदलला हा गाव''[३] -(चेहरा हरवलेला गाव)

कवीच्या बालपणातील स्मृतीचा पट उलगडत जातो आणि आठवतात आपल्याला अंगाखांद्यावर खेळवणारी पण आता जिर्ण झालेली माणसे. त्यात गावचे व गावातील देवळांचे जिर्णोद्धारी रूप, गावातील देवळांचा जीर्णोद्धार झाला. पण ज्या शाळेमुळे माणसे घडतात, जिथे खऱ्या अर्थाने माणूसकी कळते ती शाळा मात्र अजून तशीच आहे त्याच कौलारू घरात आहे. कवीला याची मोठी खंत वाटते. आता गावात एस्.टी.डी. आय्.एस्.डी. आली. कोका-कोला, थम्स्अप बरोबर देशी आणि विदेशी सुद्धा मिळू लागली आहे. तक्यातून फेकलेली मरगुबाईची दगडे पुन्हा तक्यात आलेली पाहून कवी व्यथित होतो. म्हणूनच जूनाट विहिरीच्या ढासळेतपणावर कवी चिंतन करतो. विहिरीचे ढासळते रूप हे प्रतिक वापरून ढासळत जाणाऱ्या समाज पुरुषांविषयी कवी भाष्य करतो. आणि म्हणूनच आता हा समाज अधोगतीकडे तर निघाला नाही ना ? असा प्रश्न निर्माण होतो. कवीला या सर्वच गोष्टींची चिंता वाटते. ही मरगळ आणि चिंता दूर व्हावी असे कवीला मनोमन वाटते आहे. त्यासाठी आपणच आपली मरगळ झटकून उठायला हवं. आता मागे फिरून पाहण्यात काहीही हासिल नाही. तेव्हा इथून पुढे आपली नवी ओळख करून देऊ असा आशावादी दृष्टिकोण कवी रत्नाकरांचा आहे.

''स्वत:ची स्वत:ला झालेली

नवी ओळख

उत्साहाची हलकीशी मंदगार झुळूक

कात टाकून नव्याने सळसळणारे शरीर.''[४] -(प्रवास)

मी ही व्यवस्था उलथून टाकतो असा आत्मविश्वास कवीला आला आहे. याचे कारण असे की, डॉ. बाबासाहेबाचे क्रांतीकारी विचार कवीने पूर्णपणे आत्मसात केलेले आहेत. म्हणूनच आपली एक नवी ओळख कवी करून देतो. ही ओळख खास आपली अशी असावी. ही वेगळी ओळख आपल्याला सहसा मिळणार नाही, तेव्हा यासाठी कष्ट सोसण्याची सवय आपण लावून घ्यायला हवी. तसेच आपणच आपली आत्मस्तुती न करता इतरांच्यासाठी काय करता येईल हे पाहिले पाहिजे. हे काही साधे

सोपे नाही. यासाठी फार कष्ट सोसावे लागणार आहेत. तेव्हा हे कष्ट सोसण्याची आपली सर्वांचीच तयारी असावी असे कवी रत्नाकर सूचित करतात.

"फार त्रास पडतोय या गर्दीतून
वाट काढत
स्वत:पर्यंत चालत यायला
स्वत:ची खरी ओळख व्हायला."[५] - (ओळख)

पावला, पावलावरचे हे अडथळे पार करून या मनुप्रणीत व्यवस्थेच्या गर्दीतून बाहेर पडून स्वत:ची अशी नवी ओळख करायला हवी. असे कवी रत्नाकरांनी आपल्या भीमबांधवांना सूचित केलेले आहे. रात्र वैऱ्याची आहे. तेव्हा या अंधाऱ्या रात्रीत प्रवास असताना आपल्या मुक्तीदात्या प्रज्ञासूर्याच्या प्रकाशात आपला प्रवाससुखाचा होईल. तेव्हा आपण सर्वजण उठूया आत्मगुंजनात न अडकता हा देश घडविण्यासाठी, अन्यायकारी व्यवस्था गाडण्यासाठी आपली नवी ओळख निर्माण करू या. मग यासाठी कष्टावे लागेल, झगडावे लागेल, सुख मिळणार नाही. कारण आमची सुखे ज्यांनी हिरावून घेतली त्यांच्याशीच आपल्याला दोन हात करावे लागणार आहेत. याची जाणीव कवीला आहे. म्हणून कवी म्हणतो,

"चालेल तितक्या ध्येयाचं गवत
नाहीय माझ्या
झुळझुळत्या कुरणात"[६] - (ध्येयाचं गवत)

तरीही त्वचेवरल्या गवताची मला अजिबात भीती नाही. असा आत्मविश्वास कवी देतो. "दलित कवितेच्या आशयाला स्पष्ट आंतरिक प्रेरणा आहेत व प्रकटणाला एक स्थायी निष्ठा आहे. या प्रेरणा सामाजिक क्रांतीच्या आहेत."[७] सरदेशमुखांचे हे मत खरे आहे. कारण फुले-आंबेडकरी दलित कविता हीच मुळात सामाजिक बांधिलकी स्वीकारते. कारण तिला डॉ. बाबासाहेबाच्या क्रांतीकारी विचारांची जोड आहे. म्हणून रत्नाकरांचीही कविता या विषमतावादी व्यवस्थेवर हल्ला करते. हा हल्ला उथळ नाही तो सावधपणे आणि वैचारिक अधिष्ठान असलेला आहे. हा हल्ला करतच आपणही कुठे कमी आहे का हे ही रत्नाकरांची कविता तपासते व ही कमी स्पष्ट करते.

जेव्हा बालपण होते तेव्हा कळत नव्हती इथली विषमता सोसावे लागत नव्हते जातियतेचे विषारी डंख. आता बालपण संपले, खरी विषमता समजली. या विषमतेचे

आघात आता प्रत्येकक्षणी सोसावे लागत आहेत. त्यासाठी कोणते औषध मिळेल याचा कवी तपास करतो आहे.

> "आयुष्य हळूहळू कलम करणारा दिवस
> भ्रमनिराशेचे रक्त
> बरी न होणारी दुभती जखम
> या जखमेवर कोणता लावू पाला ?"[८] -(पाला)

हे आघात आणि या आघातांच्या जखमा रोज नव्याने होतच आहेत. त्यांचे स्वरूप तीव्र आहे. या जखमेवर एकच औषध आहे. ते म्हणजे बुद्ध असे कवी विश्वासाने सांगतो.

तथागत बुद्धाने आपले संपूर्ण जीवन एकांतवासात घालविले आणि क्रांती केली. त्या क्रांतीकारक बुद्धापर्यंत आपण अजूनही पोहोचलो नाही. ही खंत कवीने व्यक्त केलेली आहे. ही अन्यायकारक व्यवस्था नष्ट करून नवी मूल्यव्यवस्था प्रस्थापित करायची असेल तर आपण बुद्धापर्यंत पोहोचायलाच हवे.

> "कपाटातील ध्यानस्थ बुद्ध
> जिवंत झाल्याचा
> किंचित हसू लागल्याचा
> हळूवार बोलू लागल्याचा
> मला होतो भास
> मी होतो पुन्हा उदास
> आम्ही त्याच्या सम्यकतेपर्यंत अजूनही
> पोचू शकलो नाही."[९] -(भास उदास)

ज्याने जगाला सम्यक ज्ञान, सम्यक दृष्टी, सम्यक क्रांती ही तत्त्वे दिली ती तत्त्वे आपण अंगीकारली पाहिजेत. हीच तत्त्वे समाज जागृतीसाठी आवश्यक आहेत. यावरूनच बुद्ध या काळाची किती मोठी गरज आहे हे कवीने स्पष्ट केलेले आहे. समाज कार्यकर्त्यास ही वास्तवाची जाणीव असायला हवी. या गोष्टीची आठवण कवी रत्नाकरांनी करून दिलेली आहे.

## २) प्रेमाचा आशय व्यक्त करणारी कविता :

'सैतानाच्या खांबावर' या कवितासंग्रहात काही मोजक्याच प्रेम कविता आहेत. या संग्रहातील प्रेमकविता ही चंद्रचांदण्यात कुठेही रमताना दिसत नाही. तिला वास्तव जगण्यातील अमिट संघर्षाची किनार आहे. या कवितेसंबंधी शरणकुमार लिंबाळे म्हणतात, ''एकीकडे प्रेमाच्या एका क्षणासाठी मरण स्वीकारण्याची तयारी असते, तर दुसरीकडे जगण्यामरण्याच्या रणधुमाळीत आपल्या प्रियेला जीवनभर संघर्षात झोकून देणारा प्रियकर असतो.''[१०]

मूळात या कवितेतील प्रियकर आहे तो अनेक शतकांच्या अंधारात चाचपडणाऱ्या गावकुसाबाहेरील समाजातील आहे. बाबासाहेबाच्या क्रांतीकारकत्वाचा वसा त्याला मिळाला आणि तो या धर्म, संस्कृतीव्यवस्था यांच्या विरोधी बंड करून उठला. या बंडाच्या रणधुमाळीत तो स्वत:बरोबर आपल्या प्रियेलाही घेतो. तिने आपल्याबरोबर यावे असे त्याचे आग्रही मत आहे. ती गरज आहे. म्हणूनच ही कविता प्रस्थापित मराठी प्रेमकवितेपेक्षा वेगळी व दाहक वाटते. या रणधुमाळीत जिने आपल्याला प्रत्येक क्षणाला साथ केली, प्रत्येक क्षण आपल्यासाठी घालविला. कवी म्हणतो, माझ्या आयुष्याच्या नव्या अंगणात पाय ठेवला ती प्रिया आता आपल्याबरोबर नाही याची कवीला सतत रुक रुक लागलेली आहे. तिच्या आठवणी घेऊन रंकाळ्यावरून येणारा वारा कवीला बेचैन करतो.

> ''तुझी उणिव
>
> भरून न येणाऱ्या जखमेसारखी''[११] – (आठवणींचा वारा)

माझी ही जखम भरून येण्यासाठी तू ये, तुझ्या दर्शनाने माझ्या प्रतिभेला कविता फूटूदे. यातून कवीची प्रियेविषयी असणारी ओढ दिसून येते. शिणलेल्या, तहानलेल्या, उजाड आणि रखरखित वाळवंटी जीवनातील तूच नंदनवन आहेस. तुझ्या बरोबर माझ्या आयुष्याची विन गुंफलेली आहे. तुझ्याशिवाय मी असूच शकत नाही. हा आकृतिबंध जेव्हा निर्माण होतो तेव्हा परिस्थितीच्या उधाणलेल्या सागरात तुझाच हात हाताला बळ देतो. कारण तिचे असणेच कवीची जगण्यावरची श्रद्धा वाढवते. कवी म्हणतो, जेव्हा तू नव्हतीस तेव्हा आई होती आणि तिच माझ्या जगण्याच 'सार' होती. आता आई नाही. तेव्हा ती भूमिकाही तूच पार पाडतेस. कारण माझा आकृतिबंध तूच आहेस, आणि जगण्याचे सार सर्वस्व सुद्धा तूच आहेस.

“माणसाला कशाची नसेना
निदान भक्कम आधाराची
असावी गरज
जगण्यावरची श्रद्धा वाढते म्हंतात
अशा आधारानेच
तू माझ्या आधाराचा आकृतिबंध.”[१२] – (आकृतिबंध)

ज्या संस्कृतीने आणि धर्माने स्त्रीला गुलाम बनविले, मादी म्हणून तिच्याकडे पाहिले केवळ उपभोगाची वस्तू म्हणून तिचा वापर केला, त्या स्त्रीचे श्रेष्ठत्व कवी रत्नाकरांनी सांगितलेले आहे. म. फुले, डॉ. बाबासाहेबाच्या विचारदृष्टीतही स्त्री ही कवीला श्रेष्ठ वाटते. कवी कोणत्याही भूमिकेतून स्त्रीचे स्थान श्रेष्ठ आहे हे नाकारत नाही. प्रेयसीमध्ये आईचे रूप पाहून कवी मातृत्त्व या संकल्पनेचा गौरव करतो. हा स्त्री विषयीचा उदात्त दृष्टिकोण सांगत असताना त्यात कृत्रिमता जाणवत नाही. तर नैसर्गिक सरलता जाणवते. कधी कवी रत्नाकरांची प्रेयसी बंडखोर होताना दिसते. तिची ही बंडखोरी आणि आक्रमकता पाहून कवीला तिची काळजी वाटते. कवी इथे विचाराने प्रगल्भ असलेल्या बंडखोर प्रेयसी विषयीची संकल्पना स्पष्ट करतो. तर तिच्याविषयी वाटणारी आंतरिक काळजी कवी शाश्वत प्रेमाच्या जाणिवेतून व्यक्त करतो. प्रवाहाच्या, व्यवस्थेच्या विरोधात उभी ठाकलेली ही प्रेयसी बंडखोर आहे. या बंडखोर प्रेयसी विषयीची आस्था इथे दिसते. असे असले तरी या रणधुकाळीत घुसताना ती आपल्या प्रियकरालाही नाकारते. मात्र तिच्यातील असणारा समजुतदारपणा, लहान वयातील बुद्धीचापल्य, तिची कोवळीकता आणि कोमलता पाहून कवीला वाटते, या भयाणक घातकी व्यवस्थेत जगणारा मुर्दाड, बोथट, संवेदनाशून्य झालेला समाज, तूला खेरच समजून घेईल का ? तिच्या जीवनात सुख, समाधान, आनंद यावा अशी कवीची प्रामाणिक इच्छा आहे. या रूढी विरोधी बंड करणाऱ्या प्रियेच्या चोहोबाजूने संस्कृतीच्या आणि धर्माच्या मक्तेदारांचे हल्ले होतील याची कवीला जाणीव आहे. म्हणून कवी रत्नाकर म्हणतात,

“तू ये
तू ये
माझ्या सताड उघड्या

आयुष्यात प्रवेश

कुठल्याही सांधी कोपऱ्यात

मनसोक्त वावर

तुझ्यासाठी आयुष्याची फुलं

उधळायला मी

केव्हापासून तयार आहे.''[१३] – (काळजीचं फुल)

इथे प्रियकराला झिडकारल्याचे दु:ख नाही. परंतु तिला जे भोगावे लागते आहे त्याचे मात्र तीव्र दु:ख आहे. म्हणूनच कवी म्हणतो की, तू कोणत्याही रूपात ये. यातून कवीची स्त्रियांबद्दलची आंतरिक आस्था तर दिसते तसेच तिचे जीवन ते माझे जीवन आहे. ही एकरूपताही दिसते. अनेक संकल्पना एकत्र करणे हे कवी रत्नाकरांच्या कवितेचे वैशिष्ट आहे. आई, प्रेयसीवरील कविता मराठीमध्ये पुष्कळ स्वरूपात आल्या पण 'तीन' स्वरूपातील एकत्र स्त्री कवी रत्नाकरांच्या कवितेत येते आणि म्हणूनच ही कविता श्रेष्ठ ठरते. कवी रत्नाकरांना महात्मा फुल्यांच्या, डॉ. बाबासाहेब यांच्या संकल्पनेतील स्त्री अपेक्षित आहे. तशी ती हवी आहे. मग ती, आई, प्रेयसी, बायको कोण ही असो. तिने या दलदलीत अडकायचे नसेल तर,

''नव्याने जगायला

नव्याने लढाईला

नव्याने वाचायला

नव्याने लिहायला

नव्याने बोलायला

: शिक''[१४] – (आधार)

कवी म्हणतो, तू नव्याने उगवशील तेव्हाच खरी सुरवात होणार आहे. तूच त्याचा आरंभ आहेस असे कवी विश्वासाने सांगतो. आपण आता लढाईला शिकलेच पाहिजे कारण आपला भूतकाळ तेच सांगतो. कवी म्हणतो अशावेळी तूच 'आवाहनतेस' हे तिचे आवाहननेच नवे परिवर्तन घडून आलेल्याचे सूचक आहे. ही पारंपरिक व्यवस्था उलटवायची असेल तर, आपल्याला लेखणीचे शस्त्र हाती घ्यावेच लागेल. निकराने, त्वेषाने लढावे लागेल. यासाठी ज्याने तुझ्या नि माझ्या जीवनातला

अंधार दूर केला तो प्रकाशपूत्र लेखणीचे शस्त्र घेऊन आपल्या मागे उभा आहे तेव्हा आपल्याला कोणतीही भीती नाही.

> "ते बघ,
> त्याच्या जयभीमच्या घोषणेचे वादळ
> कसे आकाश ढवळून काढतय"[१५] -(वादळ)

इथून पुढेच खऱ्या नवनिर्माणाला सुरुवात होणार आहे. हा दलित प्रेमकवितेला सार्थ विश्वास आहे. याची स्पष्ट चिन्हे कवी रत्नाकरांच्या 'सैतानाच्या खांबावर'मधील प्रेम कवितेत दिसून येतात.

### ३) आत्मकथन करणारी कविता :

या संग्रहातील 'आत्मचरित्र' व 'आत्मकथा' या कवितांतून कवीने आपल्या पूर्वायुष्याचा पट उलगडलेला आहे. हे आत्मकथन मांडताना कवी आपल्या जगण्याची आणि जगताना भोगलेल्या क्षणांची माहिती देतो. ज्या दारिद्रयात आई कष्टावली आणि मला जगविले त्या आईबद्दल कवी कृतज्ञ आहे. तिच्यामुळेच नव्या जागाचा अर्थ कवीला उलगडलेला आहे.

> "तिच्या घामात मला गवसला
> आयुष्याचा अर्थ
> नि अर्थाचं आयुष्यही."[१६] - (आत्मचरित्र)

अठराविश्व दारिद्रय हे पाचवीलाच पूजलेले होते. कवीच्याही हे दारिद्र घर भरून होते. या भयाण दारिद्रयाला टक्कर देत जगणारे आईवडील, समाजबांधव यांचे प्रातिनिधिक रूप कवीने आत्मकथनातून मांडलेले आहे. जगण्यातला हा आभास कवी रत्नाकर उपरोधिक पद्धतीने म्हणी, उखाण्यांच्या माध्यमातून मांडतात.

> "घरात चांदीच चांदी
> तरी अन्नधान्याची मंदी"[१७] - (आत्मकथा)

अशा लोक म्हणींचा वापर करून कवीने जगण्यातील भीषण वास्तव मांडलेले आहे. गावगाडा आणि गावगाड्यातील वर्गीय जगणे, भूकेची आग स्पष्ट करताना पाटलाच्या लग्नातील शिळे लाडू आई-वडीलाच्याहूनही प्रिय वाटू लागतात. हे भूकेची

भयानक रूप पोटात असते. तेव्हा कशाची कोणाची ओळख, तेव्हा हवी असते भाकरी भूक शमविणारी या भूकेचे चित्र कवी प्रार्थनेत मांडतो,

''आई माझालाडू
लाडू कल्पतरू
भुकेचा सावरू
लाडू लाडू ''[१८] - (आत्मकथा)

ही प्रार्थना वास्तवातील भीषण भूकेच्या आगीची आहे. ही आग जगणे जाळून टाकणारी आहे. अशावेळी कुठली आणि कशी चिऊकाऊची कथा सूचेल. ही कथा सुचण्यासाठी पोटभर अन्न हवे. आमच्या कथा ह्या अन्नाच्या शोधात फिरण्याच्या असतात. म्हणून ही चिऊकाऊची कथा ही पोटभर खाऊन नगाऱ्यावर हात फिरविणाऱ्यांसाठी आहे. हे वास्तव कवी विसरत नाही. उपासमारीने काळजीत पडलेली माणसे, झाडांचा पाला, कुर्डूची भाजी खाऊन जगणारी माणसे, त्यात पडलेला बहात्तर सालचा दुष्काळ, कधी खायला मिळाले तर मिळाले नाहीतर ऊस खाऊन काढावे लागणारे दिवस. अशा स्थितीत माणसाने कसे जगावे, ही जगण्याची आणि भीषण भूकेची स्थिती कवीने लिहिली आहे.

''येग येग सुकडी
आम्चं पोट भरी
सुकडी आली धावून
भूक गेली पळून.''[१९] - (आत्मकथा)

बालगीताचा बंध वापरुन दुष्काळात 'सुकडी' ने भूकेचा आगडोंब कसा शांत केला त्याचे बाल सुलभ मनावर उमटलेले पडसाद कवीने सांगितलेले आहेत.

वडिलांचे दारू पिणे व आईला छळणे का असायचे याचा उलगडा कवीला झालेला आहे. ज्या कुटुंबात कवी जन्मला, त्या कुटुंबातील अनेक पिढ्या कोण शाळेची पायरीही चढले नव्हते. पण कवी म्हणतो मी शाळेत जाऊ लागलो आणि मी मला उलगडत चाललो. बऱ्या वाईटाचे ज्ञान झाले. आईच्या अंगात येणारा देव कसा बंद केला यांचे शब्दचित्र कवी रेखाटतो. इथल्या अंधश्रद्धेवर आणि त्यात अडकलेल्या लोकाच्या मानसिकतेवर कवी प्रहार करतो, व अंधश्रद्धा निर्माण करणाऱ्या धर्मांचा निषेध नोंदवितो. शिक्षणासाठी कवी गाव सोडतो. पण थकत चाललेला 'बा' आणि

गंडमाळेने त्रस्त असणारी आई, संसारात पडलेली बहिण आणि घर चालविण्यासाठी आपण जवळ केलेली हॉटेल लाईन या सर्वांचा दीर्घपट कवीने उलगडलेला आहे.

हॉटेलात अपमानित जगावे लागणारे जीवन, खाव्या लागणाऱ्या मालकाच्या शिव्या, कामगारांशी रांडेसारखे वागणारे गिऱ्हाईक या सर्वांना कंटाळून कवी प्रत्येक क्षण जगण्याचाच विचार करताना दिसतो. हॉटेल लाईनमध्ये क्लिनरपासून मॅनेजर पर्यंत मारलेली मजल आणि कवीने प्राध्यापक होणे अशी झालेली उन्नती ही टप्प्याटप्प्याने उलगडत जाते. ज्याने आम्हाला मार्ग दाखविला, दु:ख, दारिद्रय, अन्यायकारी धर्माच्या दलदलितून बाहेर काढले ते प्रज्ञासुर्य बाबासाहेब होते हे आपल्या उन्नतीचे कारण आहे असे कवी अभिमानाने सांगतो.

## ४) सामाजिक विषमता स्पष्ट करणारी कविता :

कवी रत्नाकरांनी समाजाला वेठीस धरू पाहणाऱ्या संधीसाधूपणावर हल्ला केलेला आहे. प्रतिमा, प्रतीकांच्या साह्याने इथले भीषण सामाजिक वास्तव मांडलेले आहे. या सामाजिक वास्तवात स्वार्थासाठी अंधळेपणाने वाहत जाणारा व त्यांना फसविणारे संधीसाधू या संधीसाधू, सत्तालंपटांच्या लालूचीला, भडकपणाला भूलून आपणच आपले ध्येय विसरतो आहे याची तीव्र आत्मजाणीव ही कविता समाजबांधवांना करून देते.

आंबेडकरी समाजाला वेठीला धरणारी ही मंडळी चळवळीच्या कार्यकर्त्यांना गळाला लावून त्यांची भलावण करतात, व ते ही या भलावणीला कसे भूलतात याचे वास्तवदर्शी चित्र कवी रत्नाकरांनी रेखाटलेले आहे.

> ''माणसं.....
> इतकी हलकी झालीयत की
> वाहत जातात त्यांच्या पाण्याबरोबर
> नि पसरतात नको तिथं''[२०] – (पाऊस)

'पाऊस' हे प्रतिक वापरून राजकारणी प्रवृत्तीने स्वार्थासाठी समाज कसा बिघडवला आणि आपल्यातले नेतृत्व या स्वार्थाला कसे बळी पडले हे सांगितले आहे. समाजाचे अस्तित्व नष्ट करण्यासाठीच 'हा' पाऊस येतो. आणि त्याने निर्माण केलेल्या चिखलात समाज पुरता फसून जातो. प्रकाशाचे संदर्भ जपणारी माणसे एक-एक विझत जातात. या पावसाने ठेवलेले ओले भांडण मात्र दररोज भांडत बसतात. तेव्हा या

भूलथापांना आणि अमिषांना बळी पडू नका असे कवी तळमळीने सांगतो. ज्यांनी आपला स्वाभिमान गहाण टाकलेला आहे, ही स्वाभिमानशून्य पांढरपेशीपणाने जगणारी माणसे, खऱ्या अर्थाने डॉ. बाबासाहेबाच्या विचारांपासून दूरावल्यामुळे चळवळीला धक्का बसलेला आहे. यातूनच बायको, मुले, आणि आपण ही दारबंद संस्कृती आत्मसात करण्याची प्रवृत्ती बळावते आहे. आपण कोणाचे वारसदार आहोत. आपला भूत इतिहास काय आहे, याचा त्यांना विसर पडतो आहे आणि मग यातूनच एका गावात तीन-तीन जयंत्या साजऱ्या केल्या जातात. खऱ्या अर्थाने हा त्या महामानवांचा अपमान आहे. ज्यांनी आपले आयुष्य समाजाच्या उन्नतीसाठी खर्ची घातले त्यांनाच आज आपण विसरत चाललोय. हे समाजातील भयावह चित्र पाहून कवीचे मन विषण्ण होते.

"माझी जमात शासनकर्ती झाली पाहिजे" हे बाबासाहेबाचे स्वप्न होते. त्यासाठी आपल्या समाजात डॉक्टर, इंजिनिअर, वकील निर्माण झाले पाहिजेत असे त्यांना वाटत होते. आज जे डॉक्टर, वकील, इंजिनिअर निर्माण झाले, त्यांनी पांढरपेशीपणाची झूल पांघरून बाबासाहेबाच्या या स्वप्नांचा चुराडा केलेला आहे.या वृत्तीचा कवीने निषेध नोंदवलेला आहे.

"काय जयंती बियंती करता की नाय ?

हो ऽऽ तर करतो की

हं ऽऽ तेच म्हंतो मी करायची

आम्ही बघा कशी जयंती करताव सोसायटीत."[२१]-(सोसायटी कथाकाव्य)

पांढरपेशी झूल पांघरून अशी ही माणसे, स्वाभिमान शून्य होत असून अंधश्रद्धेची बळी ठरत आहेत. घरात देव, देव्हारा, गणपतीचे चित्र लावणारी संस्कृती यानी आत्मसात केलेली आहे. त्यामुळेच याना जयभीम म्हणण्याची सुद्धा लाज वाटते आहे. जात लपविण्याची वाढत जाणारी प्रवृत्ती सोसायटी कथा काव्यातून येते. सोसायटीतील माणसे आणि बाबासाहेब यांच्यातील संवाद हा प्रातिनिधिक स्वरूपात कवीने साधलेला आहे. यातूनच माणूस बदलाचे सूचक चित्र रेखाटलेले आहे. या दुटप्पीपणाचा फायदा घेऊन इथली संधी साधू मंडळी आंबेडकरी समाजाची कोंडी करण्याचा घातकी प्रयत्न करतात आणि राजकारणाला विषय मिळावा म्हणून दंगलीही घडवून आणतात. माणसांना उघड्या रस्त्यांवर जाळले जाते. झोपड्या पेटवून निरपराधांचे मुडदे पाडले जातात. देव धर्मांच्या नावावरून किंवा त्यांना

डिवचल्यावरूनही इथे दंगली उग्र रूप धारण करतात याचा प्रत्यय आजही ठिकठिकाणी येतो आहे. अशावेळी शहरे थरथरतात, माणसे डळमळतात याचे वास्तवं चित्र कवीने रेखाटले आहे.

‘‘शहर : वरून शांत
: आतून धगधगीत
दंगल : एक मोसम ’’[२२] - (दंगल)

यावरून शांत पण आतून धगधगत असणाऱ्या प्रवृत्तीना तोंड देण्याचे धाडसमात्र समतेचा संदेश देणाऱ्या बुद्धांच्या क्षमाशील करूणेतच आहे. म्हणूनच या भयावह भीषणतेतही बुद्ध आपल्या करुण पावलांनी या मोहल्ल्यात फिरत असतो. माणसांपेक्षा दगड श्रेष्ठ मानणारी व दगडांना दुधाचा अभिषेक घालणारी, माणसाला पाणी नाकारणारी ही संस्कृती या संस्कृतीत या निर्जीव दगडाला डिवचल्यावरून मुडदे पडतात. अशावेळी -

‘‘भांबावलेला फकिरही मशिदित
रहायला घाबरतो.... या मोसमात
शांत मेणबत्तीत जळणारा येशू ही
चर्चमध्ये डळमळतोय... या मोसमात ’’[२३] - (दंगल)

या निर्जीव दगडांसाठी हाडामासाच्या माणसांना बेचिराख केले जाते आहे. दंगली घडविणारे या धगधगत्या आगीत आपली डाळ शिजवून घेत आहेत. हेच तुरुंगात जातात, पुन्हा सुटतात, शांततेसाठी मोर्चे काढतात. सभा घेतात आणि यातूनच आणखी एका दंगलीची ‘गर्भधारणा’ होते. कवीचे हे सूचन वास्तववादी आहे.

समाजामध्ये जातीय वास्तवातून निर्माण होणारी सामाजिक विषमता या विषमतेत कोणाकोणाला होरपळावे लागते यांची दखल घेऊन कवी या प्रवृत्तीचा आणि विषमतेचा निषेध करतो. ती निर्माण करणाऱ्यांचा आणि निर्जिव दगडाला देव करणाऱ्या धर्माचा त्याग करतो. समाजातील ही विषमता आपले नवे रूप घेऊन अवतरलेली आहे. याची कवी उकल करण्याचा प्रयत्न करतो.

### ५) स्त्रियांच्याबद्दल आदर व्यक्त करणारी कविता :

जात, धर्म, पंथ यांच्या पलिकडे जिचे नाते आहे. ती स्त्री मग ती कोणत्याही जाती धर्माची असो. कवीला तिच्याबद्दल आदर आहे. तिचे मनुप्रणित पुरुषसत्ताक कुटुंब पद्धतीत विरघळत जाणे आणि मनाविरोधात सर्व अत्याचार सहन करणे, तिला हे भाग पाडणाऱ्या व्यवस्थेचा कवीला राग आहे. आजही इथली स्त्री ही स्वत:ला स्वत:च मारत जगते आहे. स्त्री ही या व्यवस्थेतील फक्त भोगदासी आहे, त्यामुळे तिला समाजात कोणतीच प्रतिष्ठा नाही. ही प्रतिष्ठा तिला मिळायला हवी. त्यासाठी आता स्त्रियांनीच पुढे यायला हवे व या पुरुषप्रधानतेला आव्हान द्यायला हवे. कवी म्हणतो, असे किती दिवस बसणार आहात घरांचे दरवाजे बंद करून, दु:ख सोसत. आता तरी त्या दु:खांचा आणि दु:खी मनांचा स्फोट होऊ दे. ज्याच्या योगे ही अन्यायकारी शोषण व्यवस्था उलटून जाईल, तुला न्याय मिळेल, प्रतिष्ठा मिळेल. कवी लिहितो,

"तो बघ आशेच्या समृद्धीचा
इवलासा उजेड
कसा मुलुखभर पसरतोय
त्यात मिसळ तुझे अस्तित्व
नि थांबव स्वत:ची पडझड."[२४] -(पडझड)

क्रांती ज्योती सावित्रीबाई फुल्यांनी स्त्रीला शिक्षित केले आणि क्रांती झाली. तशी पुन्हा एकदा क्रांती करायची असेल, तुझी मानहाणी थांबवायची असेल तर अखंड स्त्रियांना कवी सांगतो की, ज्यामध्ये गौतमबुद्धांची आश्वासकता आहे, डॉ. बाबासाहेबाची वैचारिकता आहे असा प्रकाश आता पडलाय तो प्रकाश तू आपल्यात सामावून घे आणि मग बघ तू नक्कीच या व्यवस्थेने चालविलेली तुझी पडझड थांबवशील. अशी खात्री कवीने दिलेली आहे.

आंबेडकरी विचार झोपडी-झोपडीपर्यंत पोहोचवण्याचे काम ही कवी रत्नाकरांची कविता करते आहे. डॉ. बाबासाहेबाच्या विचाराने निर्माण झालेली ही निळी सृष्टी तिची व्यापकता आपल्याला वाढवता आली असती पण इथल्या शिक्षित पांढरपेशीपणाचा बुरखा घेतलेल्यांना ती वाढवता आलेली नाही. या मंडळीने जर व्यापकता स्वीकारली असती तर, बाबासाहेबाचे निळे स्वप्न सत्यात उतरले असते.

मात्र आज तसे न होता आंबेडकरी विचारांशीच ही मंडळी फारकत घेऊ लागलेली आहेत. कवी म्हणतो,

''मी खाऊन पिऊन सुटलोय ऐसपैस
झालोय सुस्त
मी मुर्दाड बनत
स्वत:लाच चाललोय गिळत.''[२५]-(जोतीबा फुल्यांनी म्हटले तसे....)

समाज, नाते, गोते आपली म्हणवणारी माणसे विसरलेला हा शिक्षित पांढरपेशी नोकरदार माणूस या विषमतेचा धूर ओकणाऱ्या शहरांत स्वत:मध्येच ऐशोआरामाच्या संकल्पनेत गुंतलेला आहे. त्यांच्या अशा प्रवृत्तीमुळेच समानतेला छेद जाण्याची शक्यता आहे. त्यासाठी आत्मचिंतनाची गरज आहे. आपल्यासाठी ज्या लोकांनी खस्ता खाल्या, जे कष्ट उपसले त्याची तरी किमान आपण जाणीव ठेवायला हवी. नाहीतर तुम्ही आम्ही स्वत:ला शिक्षित म्हणवून घेणे हीच शरमेची बाब आहे. त्यापेक्षा आपल्या बहिणीलाच आईने शिकविले असते तर, तिने मात्र हा वसा नाकारला नसता. कवी लिहितो,

''जोतीबा फुल्यांनी म्हटले तसे
तिने सगळ्यांचा केला
असता उद्धार
अगदी माझाही.''[२६] - (जोतीबा फुल्यांनी म्हटले तसे....)

असे समानतेचे सूत्र मांडत कवी स्त्री शिक्षणाचा पुरस्कार करतो व इथल्या पांढरपेशी अंधानुकरणावर व स्वत:वर आत्म टीकेची झोड उठवतो.

**६) जातीव्यवस्थेवर भाष्य करणारी कविता :**

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी देशाला घटना दिली. समता, स्वातंत्र्य, बंधूते बरोबरच, धर्मनिरपेक्षतेचा स्वीकार केला. समता, स्वातंत्र्य, बंधुता या तत्वाना आज पायदळी तुडविले जाते आहे. धर्म निरपेक्ष समाज निर्मितीचे स्वप्न वाऱ्यावरच उडत गेले आणि आजही याचे भयंकर रूप आपण पाहतो आहोत. ही तत्वे आजही धर्ममार्तंड जातीचा वृथा अभिमान असणाऱ्या वर्गांकडून आजही पायदळी तुडविली जात आहेत. या देशातले स्वार्थी, सत्तांध, कर्मठ धर्माभिमानी आपल्या स्वार्थासाठी जीवंत माणसांना

जाळताहेत. मुळातच त्यांना माणसांना मारणे फार सोपे झालेले आहे. याचे कारणच असे आहे की, 'ज्यांचे सरकार त्यांचा कायदा' या न्यायाने सर्वसामान्य माणसांचा राजरोस बळी घेतला जातो आहे. यातूनच गुजरातमध्ये २००२ साली रेल्वेच्या डब्याला आग लावण्यात आली. अनेक निरपराध लोकांना जाळून मारण्यात आले. या मेलेल्यांच्यात एकही उच्चवर्णीय जळालेला नाही. जळले, मेले ते सर्व सर्वसामान्य कष्टकरी दलित होते. जातीय द्वेषातून केलेल्या या अमानुष हत्याकांडाचे कवी हृदयद्रावक चित्र उभे करतो.

"अजुन दिसतोय रक्तमांसाचा सडा
अजुन घुमतोय आसमंत
तान्ह्यामुलांच्या आर्त किंकाळ्यानी
विस्कटलेला हर एक माणूस
दुरुस्त व्हायला घाबरतोय तिथे."[२७] - (गुजरात २००२)

जे या दंगलीत, आगीत मेले, त्यांच्याच वस्त्या जाळल्या गेल्या याच वस्त्यातून पुन्हा हेच जातियवादी, 'जंगलाचा कायदा' आम्ही तुमच्यासाठी आणला आहे म्हणत आपल्याच मिरवणुकींचा जल्लोष साजरा करतील. निर्लज्जपणे पुन्हा आव्हान आणि पुन्हा जाळपोळ असा होत राहील अखंड गुजरात २००२. हे जातियवादी हा गुजरात पॅटर्न देशभर लागू करतील आणि काय सांगावे हाच जगासाठी आदर्श आहे. म्हणून ही सांगतील अशा या मानवी हत्या करणाऱ्या जातीयवादी धर्मांध शक्तींचा कवी परखड निषेध नोंदवतो, त्यांचा धिक्कार करतो. या देशामध्ये खऱ्या अर्थाने ज्या वयात ज्यांच्यावर आदर्श मानवतावादाचे चांगले संस्कार व्हावयास हवेत ते होत नाहीत. नेमके उलट्या पद्धतीने ते होताहेत. लहान मुलांच्यावर हे चांगले संस्कार व्हायच्या ऐवजी त्यांना जात, धर्म, पंथ व माहित नसणाऱ्या वयातच त्यांना जातियता शिकविली जातेय. राजरोसपणे धर्माच्या नावावर दुभंगून टाकली जाताहेत ही बालमने. शिकविले जातेय याच वयात त्यांना निर्जिव दगडाचे मोठेपण. या सर्वांना धार्मिक, आणि सांस्कृतिक मूल्यांच्या नावाखाली जपले जाते आहे प्राणापलिकडे. तेव्हा वेळीच या प्रवृत्तीला रोखायला हवे. नाहीतर उद्याचा भारत हा जातियतेच्या, धर्मांधतेच्या वनव्यात धगधगताना आपल्याला दिसेल. हे थांबवायचे असेल तर आज एकच पर्याय आपल्यासमोर आहे. तो म्हणजे बुद्ध. हे सर्व थांबविण्यासाठी आपल्याला बुद्धांच्या विचारांचे पालन केले पाहिजे. बुद्ध पुढे नेला पाहिजे. छप्पनच्या धम्मक्रांतीची वेल पुन्हा

सजिव करून ती सर्वत्र पसरविली पाहिजे. या सर्वांवर दवा असणाऱ्या बुद्धाला पुढे नेण्याची गरज कवी प्रतिपादित करतो आणि जरी या कामी कोणीही पुढे आले नाही तरी मी ते काम करतच राहणार आहे. अशी दुर्दम्य आशा, आत्मविश्वास कवी व्यक्त करतो.

"तिकडे युद्ध झाले
अनुस्फोट झाले
तरीही मला बुद्ध पुढे नेलाच पाहिजे."[२८] - (चक्र)

जगाला शांतीचा संदेश देणारा बुध्द आज किती गरजेचा आहे. याची तिव्रता कवीने सांगितलेली आहे. जातीच्या, धर्माच्या, देवांच्या नावावर चाललेली अनागोंदी थांबवायची असेल तर चोवीस आऱ्यांचं चक्र घेऊन आपण गतिमान व्हायला पाहिजे. त्याशिवाय आता पर्यांयही उरलेला नाही. तेव्हा हे दलित पिडीतांनो चला उठा माझ्याबरोबर ज्याने जगाला अहिंसेच महान तत्त्वज्ञान दिले तो बुद्ध पुढे नेऊया. असे आव्हान कवी रत्नाकरांनी आपल्या भीमबांधवांना केलेले आहे. आपण जबाबदारी झटकली तर अनर्थ होईल, तुमचे माझे अस्तित्व पुन्हा एकदा धोक्यात येईल. कारण इथली व्यवस्थाच प्रत्येक माणसाला जातीधर्माच्या चौकटीत जन्माला घालते आहे. कवी लिहितो,

"तसा प्रत्येक माणसालाच
आहे एक वास
जातीचा धर्माचा पंथाचा"[२९] - (वास)

जात, धर्म, पंथ कळण्याच्या अगोदरच इथे अजान बालकांच्यांवर शाळेतच रूजविला जातोय या सर्वाचा संस्कार. त्यांना सांगितली जातीय त्यांची जात. इथे मनुप्रणित व्यवस्था राबविणारेच गेली अनेक वर्षाच्या बुद्धाच्या शांततेला चिरे पाडायचे काम करत आहेत. या प्रदूषित शहरांत असा एकही माणूस सापडणार नाही. जो जाती धर्माभिमानाशिवाय असेल. याजातीयतेचे पूर्वीचे स्वरूप आता राहिले नाही. असा जरी सूर निघत असेल, तरी वास्तवात ते तसे नाही. चेहरा बदलून चालायचे तसे चालूच आहे. जातीयतेचा वास या शहरांशहरांतून काढण्यासाठीच छप्पनची धम्मक्रांतीवेल सर्व दूर पर्यत नेली पाहिजे असा विश्वास कवी रत्नाकरांनी व्यक्त केलेला आहे. हजारो वर्षे अस्तित्वात असणारे जाती वास्तव सहसा पुसले जाणार नाही. कारण त्याची पाळेमूळे

फार खोल मनुपर्यंत रूजलेली आहेत. या दाहक वास्तवाची जाणीव कवी रत्नाकरांची कविता करून देते.

### ७) व्यक्तीचित्रणात्मक कविता :

कवी रत्नाकरांच्या कवितेमध्ये येणारी व्यक्तिचित्रणेही रत्नाकरांनी शब्द सामर्थ्याच्या जोरावर अचूक व हुबेहुब रेखाटलेली आहेत.

ज्यांच्याकडे प्रतिभेचा मुकुट मणी होता. ज्यांच्याकडे शक्तिशाली विद्रोह होता. ज्यांची कविता माणसालाच पाणी नाकारणाऱ्या व्यवस्थे विरोधी लढत होती. ज्याच्या कवितेने अखंड मानवेतेचे स्तोत्र गाईले अशा कवीचे चित्र कवी रत्नाकरांनी रेखाटले आहे.

''त्याची कविता माणसांची
माणसांसाठी माणसांकरिता.''[३०] – (कवीची गोष्ट)

ज्याला बुद्ध मान्य होता, ज्याने आंबेडकरी विचार आत्मसात केलेले होते आणि म्हणूनच त्याने स्त्रीचे मोठेपणही मान्य केलेले होते असा प्रतिभाशाली कवी एक दिवस इथल्या संधीसाधूच्या गोटात ओढला गेला व आपल्या ध्येयापासून घसरला. ज्याची भूमिकाच जगणं + लिहिणं = कविता. अशी होती. त्याची घसरण कवी रत्नाकरांनी लोककथेचा बंध वापरुन साकारलेली आहे.

''तो इतरत्र वरंगळण्याआधी
लिहायचा छान
त्याच्या कवितेत विचार आचार याचं
बेमालूम संमिश्र.''[३१] – (कवीची गोष्ट)

तो आपल्या भूमिकेशी ठाम होता तोपर्यंत त्याच्या कवितेत दम होता. आता मात्र तो फक्त लिहितो. त्यात तळमळ आणि दम नसतो.

असेच कवीने 'कुबड्या थळू आज्या'चं व्यक्तिचित्र रेखाटलेले आहे. या थळू आजाने आंबेडकरांना पाहिलेले होते. त्यांच्या आठवणी तो तक्क्यात सांगत असे. थळू आजा हा घुमके वाजविण्यात पटाईत होता. तो बाबासाहेबाची गाणी गात असे व बाबासाहेबाच्या आठवणीनी गहिवरूनही जात असे. कवी लिहितो,

"आज नाही थळू आजा
तरीही त्याच्या आठवणींचं घुमकं
त्याचं गाणं
घुमघुमतय आमच्या मनामनात."[३२] - (कुबडा थळू आजा)

थळू आजाचे हे व्यक्तिचित्र कवीने अजरामर करून ठेवलेले आहे. कवी रत्नाकरांची शब्दसृष्टी सशक्त असल्यानेच त्यांनी ही व्यक्तिचित्रे शब्दांच्या माध्यमातून जिवंत केलेली आहेत.

**८) डॉ. बाबासाहेबाच्याविषयी आदर व्यक्त करणारी कविता :**

बहुजनांचा राजा प्रज्ञासूर्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर ह्या महामानवाला समोर ठेवून कवी म्हणतो, 'एक होता राजा, त्याच्या दोन राण्या' ही कथा मी कधीच नाकारलेली आहे. कारण मूळात ही कथाच आमच्या राजाची नव्हे. आमचा राजा असा नव्हता.

"आमचा राजा
झोप्ला नाही मखमली पलंगावर
जागृतीच्या दिव्यांची उजळलेली
त्याच्यात प्रत्येक रात्र न् दिवस"[३३] - (१ होता राजा)

आमच्या या राजाने सोसलाय इथला अन्याय अत्याचार म्हणूनच त्याने या अन्याय अत्याचाराला संपविण्यासाठी आणि अमानुष धर्मसंस्कृतीला संपविण्यासाठी बुद्धाची क्रांती समाजमनात पेरलेली आहे. त्यासाठी तो स्वत: झिजलेला आहे. त्याने पाहिले ते दीन दलितांच्या मुक्तीचे स्वप्न. मग त्याला ऐश्वर्यांची स्वप्ने कशी पडावीत. हा आमचा उद्धारकर्ता ऐश्वर्यात पलंगावर लोळला नाही. तर निभिड अंधार असणाऱ्या वस्तीवस्तीत मशाल घेऊन फिरला, आणि निर्माण केला अंधाराला चिरत जाणारा प्रकाशमान माणूस.

"१ होता राजा
त्यांची १ राणी
जी झिजली राजासाठी
राजा झिजला माणसांसाठी

हे लिहित सांगत फिरणाराहे मी.''[३४] - (१ होता राजा)

माता रमाबाई आपल्या राजासाठी खूप झिजल्या. भयंकर त्रास सहन केला. अष्टोप्रहर आंबेडकरांच्यामागे सावली सारख्या उभ्या राहिल्या. त्यांच्या कर्तृत्वाचा गौरवकवी रत्नाकरांनी केलेला आहे. आपल्या बांधवांच्या उद्धारासाठी त्यांनी आंबेडकरांना कशी मदत केली हे कवी सांगत फिरणार आहे. कारण आपल्या भीम बांधवांना या त्यागाचे आणि समर्पनाचे सतत स्मरण रहावे ही कवीची तळमळ आहे. या माणसासाठी कष्टलेल्या राजाचा वापर स्वार्थासाठी होताना पाहून कवी व्यथित होतो. तुझ्या पश्चात किती वर्षे लोटली तरी अजून कोणतीच चळवळ तग धरू शकलेली नाही. कारण आज तुझे अनुयायी म्हणविणारेच विकले गेले आहेत, सत्तेच्या बाजारात आणि त्यांनी स्वत:बरोबर तुझाही सौदा चालविलेला आहे. तुझ्याशिवाय त्यांना स्वार्थच साधता येत नाही. भीमा तुझ्या मागारी तुझ्या चळवळीचाही इतका वेगळा अर्थ घेतला गेला की, तुझे 'शासनकर्त्या जमातीचे' स्वप्नच मोडून पडलेले.

''ह्या पिढीला नाहीयत तुझ्या
विचारांचे डोळे.''[३५] -(भीमा)

तू ज्यांच्यासाठी झिजलास, ज्यांना विरोध केलास त्यांच्याच गोटात तुझे अनुयायी म्हणविणारे त्यांच्या खांद्यावर हात टाकून फिरताहेत. हा चळवळीचा पराजय आहे. अशी रत्नाकरांनी खंत व्यक्त केलेली आहे.

बाबासाहेबाच्या नावाचा आणि विचारांचा सत्तेसाठी चाललेला सौदा पाहून कवीचे हृदय विदीर्ण होते. सध्याची तरुण पिढी बेजबाबदारपणे वागते आहे. त्यांना तुझ्या विचारांची प्रगल्भता नाही. फक्त तुझ्या नावाचा जयघोष अंधळेपणाने करतात. त्यांना तुझ्या विचारांचे डोळे नाहीत. हे कवीच्या सुक्ष्म निरीक्षणातून सुटत नाही. असे असले तरी कवी रत्नाकर हे आशावादी आहेत. चुकलेल्यांना पुन्हा वास्तवाचे भान यावे म्हणून उड्डाणाचे सामर्थ्य देणाऱ्या आंबेडकरांचे जीवन शब्दरूप घेऊन महाकाव्याचा विषय ठरते. या दिशाहीन भीमाच्या वारसदारांना कवी भीम विचारच त्रिकालाबाधीत सत्य असल्याची आठवण करून देतो.

''तू जन्माला घातलेली पुस्तकं
प्रत्येक शतकावर तुझीच
मुद्रा उठवत राहतील भीमा

तुझीच मुद्रा उठवत राहतील.''[३६] - (भीममुद्रा)

तळहातावरच्या फोडाप्रमाणे जपलेल्या माणसांनी जरी धोका दिला तरी, कवी विश्वासाने सांगतो की, शतकामागून शतके संपली तरी या प्रकाश पुत्राच्या विचारांचा ठसा कायम राहील व तोच देशाला तारक ठरेल असा प्रचंड विश्वास कवी रत्नाकरांनी दिलेला आहे. विषमतेच्या ठेकेदारांना धडा शिकवायचा असेल, स्वार्थाने बरबटलेल्यांना मार्गावर आणायचे असेल तर, आपल्याला सामाजिकतेची बांधिलकी स्वीकारलीच पाहिजे. त्यासाठी गुलामगिरीची, धर्माची जोखडे फेकून देणाऱ्या बाबासाहेबाच्या विचारांची वाट अनुसरली पाहिजे. जर आपण या विचाराने गेलो नाही तर, संस्कृतीच्या रखवालदारांनी जागोजागी टांगलेल्या विषमतेच्या, गुलामगिरीच्या पिंजऱ्यात पुन्हा आपण अडकू आणि असे झाले तर परत एकदा आपला आवाज मूक झाल्याशिवाय राहणार नाही. म्हणून ज्या बापाने चोचीत चारा दिला, ज्या चोची बोलत्या केल्या त्या बापाला विसरून मार्गक्रमण करताच येणार नाही असा इशारा कवी देतो.

''त्यांना माहित नाही
ते उडताहेत त्या आकाशातही
पिंजरे आहेत अजून
ते निखळू शकत नाहीत बापाशिवाय.''[३७]

- (चोची बोलक्या करणारा बाप)

फुले-आंबेडकरी विचारांशी आपले अंतरीक नाते सांगणारी रत्नाकरांची कविता ही, फुले-आंबेडकरी विचार धारेशी आपली नाळ तुटली तर आपल्याला जगणे असहाय्य होईल याची जाणीव करून देते. डॉ. बाबासाहेबाच्या विचारानेच मार्गक्रमण केल्याने आपले जगणे सुखकर होईल. आपल्याला आकाशात मुक्तपणे उडता येईल, कारण आपल्या पंखात बळ भरण्याची ताकद याच विचारांत आहे. पिंजऱ्यासकट उडण्याचे सामर्थ्य फक्त आंबेडकरी विचारांतच असल्याचा कवीने विश्वास दिलेला आहे. जात, धर्म, संस्कृतीचे पावला पावलावरील हे पिंजरे तुमच्यासाठीच आहेत. आपण वेळीच सावध झालो नाही, आंबेडकरांच्या विचारांने गेलो नाही तर, आपण या सापळ्यात अडकल्याशिवाय राहणार नाही. यासाठी रत्नाकरांची कविता पूर्व सावधानतेचा इशारा देते.

### ९) इतर आशयसूत्र मांडणारी कविता :

ज्या देशामध्ये लोकशाहीच्या नावाने डांगोरा पिटला जातो त्याच देंशात मानवी मूल्यांचे होणारे वस्त्रहरण कोणाला दिसत नाही. इथे हकनाक मेलेल्यांचा कळवळा नाही की, त्यांच्याबद्दल सहानुभूती नाही. मेलेल्यांच्या शोकसभेत आपला कार्यभाग साधून घेणारे हे पुढारी, राजकारणी सत्तेसाठी लोकशाहीवर माती टाकायला तयार आहेत. 'बदल हा सृष्टीचा नियम' असतो. हे सत्य अडीच हजार वर्षापूर्वी गौतम बुद्धांनी सांगितले. पण आजही सत्तेसाठी अंधळी झालेली ही मंडळी त्याकडे दुर्लक्षच करते आहे. त्यांना फक्त सत्ता आणि खुर्ची प्रिय आहे. सरकारच्या या नपुसंक धोरणांची खिल्ली उडवत २००१ साली प्रजासत्ताक दिनादिवशी झालेल्या भूकंपाची करुण कहाणी सांगितलेली आहे.

'भारत माता की जय' म्हणत प्रभात फेरीसाठी नटून थटून आलेली बालके, भारत मातेच्या जयजयकारात मग्न असताना अचानक भूकंप होतो व त्यात ३५० अजान चिमुरडी मातीच्या ढिगाऱ्याखाली गाडली जातात. अशावेळी लोकशाहीचा डोलारा सांभाळणारी मंडळी मात्र स्वातंत्र्याच्या वांझ गप्पात रंगून गेलेली असते. या चिमुरड्याचा आक्रांत त्यांना ऐकुही येत नाही. हा आक्रांत शांत करण्यापेक्षा त्यांच्या राजकारणावर गप्पा चाललेल्या असतात. या ढोंगी प्रवृत्तीचा निषेध करून मानवी मूल्यांचे अवमूल्यन करणाऱ्या प्रवृत्तीचे कवीने वाभाडे काढलेले आहेत. त्यांचा असली चेहरा उघडा केला आहे.

कवी रत्नाकरांची कविता ही मानवतेच्या नवनिर्माणासाठी झटणारी आहे. म्हणूनच समतेचे राज्य निर्माण व्हावे अशी तिची सार्थ अपेक्षा आहे.

''शांत करुया
चला त्या चिमुरड्यांना:
    फुलवू या
सिद्धांत :
    बदल सृष्टीचा नियम :
        : बुद्ध.''[३८] – (२००१ चा प्र.भूकंप)

देशात वाढलेली बेकारी, उपासमार, उपपासमारीने मरणारी माणसे, हा देश माझा आहे असे म्हणणारी उघड्या फुटपाथवर मरणारी माणसे. लोकशाहीचा डोलारा

सांभाळणाऱ्या कोणालाही दिसत नाहीत. मात्र सत्तेच्या सौदेबाजारात ही मंडळी सत्तेचे संभोग सोहळे साजरे करत आहेत. कोणाला सुख नाही की दु:ख नाही. कवी म्हणतो,

''मायबाप सरकारला फुटलीय
सत्तालालसेची मुर्दाड पालवी.''[३९] – (सरकार)

विषमतेला खतपाणी घालणाऱ्या या देशात एकीकडे सर्व सुखे झोपाळ्यावर बसून झुलताहेत. तर दुसरीकडे मात्र अंग झाकण्यापुरतेही वस्त्र नाही. इतकीही विषमतेची दरी. ही दरी भरून काढण्यासाठी कोणीही प्रयत्न करत नाही. उलट ही दरी कशी वाढेल याचा विचार चाललेला असतो. याशिवाय मताचे राजकारण करताच येत नाही. सरकारच्या आणि राजकर्त्यांच्या या दुटप्पी धोरणावर ही कविता टीकास्त्र सोडते. दलित, पिढीताचे दु:ख मांडतानाच त्यांच्याबद्दलचा आत्मिय जिव्हाळा व्यक्त करते. किंबहुना रत्नाकरांच्या कवितेचा केंद्रबिंदूच माणूस आहे. त्यामुळे मानवतेच्या विरोधात कार्यरत असणाऱ्या प्रवृत्तीवर ती हल्ला बोलते व माणसाचे गाणे गाते.

## १०) शीर्षकाशय सांगणारी कविता :

जगाच्या पाठीवर असा एकही धर्म नाही की जोमाणसाला माणुसकीची सर्व मूल्ये बहाल करेल. पण दुष्ट प्रवृत्तींच्या माणसांसह सैतानी प्रवृत्तीलाहीकवेत घेऊन त्याच्यात बदल घडवून आणण्याचे सामर्थ्य फक्त बौद्ध धम्मात आहे. सर्वहारा मानवाच्या उन्नतीचा वैज्ञानिक मार्ग जो बुद्धानी सांगितला. तो आजही कोणी अनुसरीत नाही. उलट त्याचा द्वेषच करतात. तरीही ज्या कारुणीक बुद्धाने जगाला शांतीचा संदेश दिला, अहिंसा दिली ते बौद्ध तत्त्वज्ञान मात्र कोणताही भेदभाव करत नाही.

''क्षमाशील चिवराने तोंड पुसून
नगरानगरातून जातो बनवत
प्रेमशांतीचे रस्ते.''[४०] – (सैतानाच्या खांबावर)

बामयानातील बुद्धाच्या मूर्ती रॉकेट आणि बॉंबच्या साह्याने उद्ध्वस्त केल्या, तेव्हा सारे जग हळहळले. पण या सैतानांना काहीही वाटले नाही. कारण सैतान कधीच माणसांशी सलगीने वागत नाही. तालीबांनी हिंसक आणि हिनकस वृत्तीचे हे कृत्य त्यांनी केले. रक्तपाताशिवाय क्रांती करणाऱ्या या बामयानातील बौद्ध राजाचा इतिहास

उंदराच्या दाताने कुरतडण्याचा प्रयत्न केला. तेव्हाही निषेधाच्या कपाळी त्रिशरणाच्याच ओळी होत्या. कवी लिहितो,

> "हुसेन सागरातील बुद्ध
> अजंठा वेरूळ दगडी लेण्यातील बुद्ध
> सगळे बुद्ध तरी ही
> हास्य करीत होते, अंगिकार
> देत होते जगाला
> करुणेचे डोळे."[४१] - (सैतानाच्या खांबावर)

या सैतानी प्रवृत्ती विरोधी या राजाला राग नव्हता तर, तो या सैतानांकडे सुद्धा करुणेच्या डोळ्यानेच पाहत होता. कवी रत्नाकर म्हणतात की, हा इतिहास त्यांनी कुरतडायचा किंवा पुसायचा प्रयत्न केला तरी तो पुसला जाणार नाही आणि जर कोणी तसा प्रयत्न केला तर तो आम्ही करू देणार नाही. म्हणूनच बुद्धाने सांगितलेली समता प्रस्थापित करण्यासाठी हा सैतानाचा खांब उद्ध्वस्त करायलाच पाहिजे. त्यासाठी रत्नाकर स्वतःच या सैतानी खांबावर दगडाचा प्रहार करून या दुष्ट सैतानी प्रवृत्तीचा निषेध नोंदवितात व दगडमारून हा खांब उद्ध्वस्त करण्यासाठी कवी आव्हान करतो आहे. पुन्हा एकदा 'हाज'ची ललाटी आणण्यासाठी कवी या सैतानाच्या खांबाच्या उद्ध्वस्ततेत गुंतलेला आहे.

कवी रत्नाकरांची कविता ही फुले-आंबेडकरी विचारांची वाहक असल्याने या कवितेच्या माध्यमातून आंबेडकरांच्यापासून ते थेट बुद्धांपर्यंत जाता येते. हे या कवितेचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे.

वरील प्रदीर्घ विवेचनावरून या प्रकरणात काही निष्कर्ष निघतात. ते खालीलप्रमाणे सांगता येतील.

**निष्कर्ष :**

१) १९८० नंतरच्या दलित कवितेने जी नवी परिभाषा स्वीकारली, नवनवी मिथके स्वीकारली त्याचा प्रभावीपणे प्रत्यय 'सैतानाच्या खांबावर' मधील कवितेतून येतो.

२) रत्नाकरांची कविता ही आशय, विषयांचा परीघ रुंदावत असतानाच नव्या संस्कृतीच्या स्वीकारासाठी, स्वागतशिल असलेली आहे.

३) ही कविता फुले-आंबेडकरी विचारांना शरण जाते व समाजोन्नती हेच आपले ध्येय असल्याचे ठासून सांगते.

४) लोकसाहित्याचा आकृतिबंध स्वीकारून या संग्रहातील कविता सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, धार्मिक व्यंगावर प्रहार करते.

५) उपमा, प्रतिमा, प्रतिके यांच्या वापरातून कमीत कमी शब्दांत ही कविता मोठा आशय मांडते.

६) ही कविता प्रामुख्याने मुक्त छंदात येत असली तरी बाह्य सौंदर्यापेक्षा त्यात आशयाला प्राधान्य दिलेले आहे.

७) समाजातील विषमतावादी वृत्ती, धार्मिक पाखंडावर हल्ला करून ही कविता बुद्धतत्त्वाचा स्वीकार करते.

८) सामाजिक उन्नतीसाठी झटणारी रत्नाकरांची कविता ही आक्रस्ताळी वाटत नाही. तर ती बुद्धाच्या संयमाने परिवर्तनाची मागणी करते. तिला रक्तरंजनापेक्षा अहिंसा प्रिय आहे.

९) समाजाचे दाहक वास्तव मांडताना उरबडवेपणापेक्षा ही कविता लेखणीच्या हत्याराने लढू पाहताना दिसते.

१०) समाजातील विषमतेवर हल्ला करत माणसाच्या नवनिर्माणासाठी, कल्याणासाठी ती आवाहन येते. ती जशीआवाहनते तशी नव्याच्या निर्माणासाठभ क्रियाशीलही होते.

११) आशय अभिव्यक्तीच्या अंगाणे ही कविता श्रेष्ठ आहे. ही कविता मुक्त छंदात असली तरी कोठेही रसभंग होत नाही. त्यामुळे तिचे वाङ्मयीन मूल्यही श्रेष्ठच आहे.

**समारोप :**

परखड भाषाशैली, योग्य आणि मोजक्याच शब्दांचा वापर, लोकसाहित्याचा अनुबंध वापरून वाचकाला अंतर्मुख करणारी विषय मांडणी यामुळे ही कविता सशक्त झालेली आहे. कवी नामदेव ढसाळांच्या कवितेशी ही कविता नाते सांगणारी आहे. तरीही ढसाळांच्या कवितेइतकी दाहकता इथे जाणवत नाही. या कवितासंग्रहांचे मुखपृष्ठ मक्का मदिनेतील सैतानाच्या खांबाची आठवण करून देते. हा सैतानाचा खांब पडून इथली सैतानी वृत्ती संपुष्टात येणार असल्याचेही सूचन मिळते.

कमी शब्दांत प्रचंड आशय घनता हे या संग्रहाचे व संग्रहातील कवितेचे खास वैशिष्ट्य आहे. मानवतेचे मूल्य जपण्यासाठी ही कविता या सैतानाच्या खांबावर दगड मारण्याचे सामर्थ्य प्रत्येकाच्या हातात निर्माण करेल असा विश्वास आहे.

-----

## संदर्भ


| | | |
|---|---|---|
| १) | रत्नाकर धम्मपाल | : 'सैतानाच्या खांबावर' समृद्धी प्रकाशनं, कोल्हापूर, प्र.आ. डिसेंबर, २००३, पृ.क्र.३२. |
| २) | सुरवाडे अरविंद | : 'सहस्त्रकोत्तर आंबेडकरी कविता', लेख), अस्मितादर्श, अंक २रा, एप्रिल-मे-जून, २००५. |
| ३) | रत्नाकर धम्मपाल | : 'सैतानाच्या खांबावर', समृद्धी प्रकाशन, कोल्हापूर, प्र.आ., डिसेंबर, २००३, पृ.क्र.३. |
| ४) | रत्नाकर धम्मपाल | : उनि.,'प्रवास', (कविता), पृ.क्र.२७. |
| ५) | रत्नाकर धम्मपाल | : 'ओळख', (कविता), पृ.क्र.२९. |
| ६) | रत्नाकर धम्मपाल | : 'ध्येयाचं गवत', (कविता), पृ.क्र.२८. |
| ७) | सरदेशमुख त्र्यं.वि. | : 'अस्मितादर्श', दिवाळी अंक, १९७७, पृ.क्र.७. |
| ८) | रत्नाकर धम्मपाल | : 'सैतानाच्या खांबावर', समृद्धी प्रकाशन, कोल्हापूर, प्र.आ., डिसेंबर २००३, पृ.क्र.३९. |
| ९) | रत्नाकर धम्मपाल | : उनि., 'भासउदास', (कविता), पृ.क्र.४२. |
| १०) | लिंबाळे शरणकुमार | : 'दलित प्रेम कविता', संपादन -प्रचार प्रकाशन, कोल्हापूर,प्र.आ. १९८६, प्रस्तावना, पृ.क्र.४. |
| ११) | रत्नाकर धम्मपाल | : 'सैतानाच्या खांबावर', समृद्धी प्रकाशन, कोल्हापूर, प्र.आ., डिसेंबर, २००३, पृ.क्र.२३. |
| १२) | रत्नाकर धम्मपाल | : उनि., 'आकृतिबंध', (कविता), पृ.क्र. ४६. |
| १३) | रत्नाकर धम्मपाल | : उनि., 'काळजीचं फुलं', (कविता), पृ.क्र. ३०. |
| १४) | रत्नाकर धम्मपाल | : उनि., 'आधार', (कविता), पृ.क्र. १९. |
| १५) | रत्नाकर धम्मपाल | : उनि., 'वादळ', (कविता), पृ.क्र.५२. |
| १६) | रत्नाकर धम्मपाल | : उनि., 'आत्मचरित्र', (कविता), पृ.क्र.५७. |
| १७) | रत्नाकर धम्मपाल | : उनि., 'आत्मकथा', (कविता), पृ.क्र.६१. |
| १८) | रत्नाकर धम्मपाल | : उनि., 'आत्मकथा', (कविता), पृ.क्र.६२. |
| १९) | रत्नाकर धम्मपाल | : उनि., ' आत्मकथा ', (कविता), पृ.क्र.६३. |
| २०) | रत्नाकर धम्मपाल | : उनि., 'पाऊस', (कविता), पृ.क्र.३७. |
| २१) | रत्नाकर धम्मपाल | : उनि.,'सोसायटी कथा काव्य',(कविता),पृ.क्र.१३. |

२२) रत्नाकर धम्मपाल : उनि., 'दंगल', (कविता), पृ.क्र.३४.
२३) रत्नाकर धम्मपाल : उनि., 'दंगल', (कविता), पृ.क्र.३४.
२४) रत्नाकर धम्मपाल : उनि., 'पडझड', (कविता), पृ.क्र.५४.
२५) रत्नाकर धम्मपाल : उनि., 'जोतीबा फुल्यांनी म्हटले तसे',(कविता), पृ.क्र.५.
२६) रत्नाकर धम्मपाल : उनि.,'जोतीबा फुल्यांनी म्हटले तसे',(कविता), पृ.क्र.५.
२७) रत्नाकर धम्मपाल : उनि., 'गुजरात २००२', (कविता), पृ.क्र.१७.
२८) रत्नाकर धम्मपाल : उनि., 'चक्र', (कविता), पृ.क्र.२६.
२९) रत्नाकर धम्मपाल : उनि., 'वास', (कविता), पृ.क्र.४१.
३०) रत्नाकर धम्मपाल : उनि., 'कवीची गोष्ट', (कविता), पृ.क्र.२१.
३१) रत्नाकर धम्मपाल : उनि., 'कवीची गोष्ट', (कविता), पृ.क्र.२०.
३२) रत्नाकर धम्मपाल : उनि., 'कुबडा थळू आजा', (कविता), पृ.क्र.७.
३३) रत्नाकर धम्मपाल : उनि., '१ होता राजा', (कविता), पृ.क्र.९.
३४) रत्नाकर धम्मपाल : उनि., '१ होता राजा', (कविता), पृ.क्र.९.
३५) रत्नाकर धम्मपाल : उनि., 'भीमा', (कविता), पृ.क्र.४७.
३६) रत्नाकर धम्मपाल : उनि., 'भीम मुद्रा', (कविता), पृ.क्र.५०.
३७) रत्नाकर धम्मपाल : उनि.,'चोची बोलक्या करणारा बाप',(कविता), पृ.क्र.५५.
३८) रत्नाकर धम्मपाल : उनि.,'२००१चा प्रजासत्ताक भूकंप',(कविता), पृ.क्र.१५.
३९) रत्नाकर धम्मपाल : उनि., 'सरकार', (कविता), पृ.क्र.४४.
४०) रत्नाकर धम्मपाल : उनि., 'सैतानाच्या खांबावर',(कविता), पृ.क्र शीर्षक कविता.
४१) रत्नाकर धम्मपाल : उनि., 'सैतानाच्या खांबावर', (कविता), पृ.क्र. शीर्षक कविता.

------